**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी**

**मार्केट विभाग**

**दैनंदिन बाजार फी, स्टॉल भाडे व मंडप फी वसुलीकामी अभिकर्ता नियुक्ती संबंधी इ निविदा**

**अटी शर्ती**

१) दैनदिन बाजार फी , स्टॉल भाडे व मंडप फी इ. चा वसुलीचा ठेका 2 वर्षाकरीता असेल. याकरिता आधारभूत किंमत खालीलप्रमाणे असेल. निविदाधारकाची आधारभूत किंमतीच्या कमी रक्कमेची निविदा स्विकारणेत येणार नाही.

| अ.नं. | सन (कालावधी) | आधारभूत किंमत |
|---|---|---|
| 1 | प्रथम | रक्कम रु. १,१३,७४,०००/- |
| 2 | द्वितीय | प्रथम वर्षाच्या ई निविदेमध्ये भरलेल्या उच्चत्तम रक्कमेमध्ये ५% वाढ करुन येणारी रक्कम. |

२) द्वितीय वर्षाच्या येणाऱ्या निश्चित आधारभूत रक्कमेतील 3 महिनेची रक्कम करारपत्र करणेपूर्वी रोख / D.D. द्वारे भरणेची आहे. व तद्नंतर प्रति महीना येणारी रक्कम आगाऊ भरणेची आहे. मुदतीत आगाऊ रक्कम न भरणा केलेस 3 महिन्याची आगाऊ भरलेली रक्कम जप्त करुन विना नोटीस ठेका रद्द करणेची कार्यवाही करणेत येईल.

३) आगाऊ भरलेली 3 महिन्याची रक्कम द्वितीय वर्षाच्या शेवटच्या 3 हप्त्यामध्ये कमी करणेत येईल.

४) कार्यादेशावेळी 3 महिन्याचे धनादेश व 1 महिन्याचा होणारी रक्कमेचा DD तसेच महिन्यानंतर दरमहा 1 महिन्याचा धनादेश/ D.D. आगाऊ रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच ठेका ज्या नावे व्यक्ती / संस्था मंजूर झाला आहे त्यांच्या नावाने धनादेश देण्याचा आहे.

५) मंजूर वार्षिक निविदा रक्कम उक्त अ.क्र. ३ नुसार ज्यात्या वर्षात पूर्तता करणे बंधनकारक राहील. अन्यथा नोटीस न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार महापालिकेस राहील.

६) तसेच सदर ठेका मंजूरी नंतर तृतीय वर्षासाठी मा. आयुक्त व मक्तेदार यांची एकमेंकाची सहमती झालेस तिस-या वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबत सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेने निर्णय करणेत येईल.

७) द्वितीय वर्षात ई-निविदा धारक यांनी तृतीय वर्षासाठी मुदत वाढीसाठी ६ महीने अगोदर अर्ज देणे बंधनकारक राहील. अर्ज न आलेस मुदत वाढ न देता पुढील निविदा प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच तृतीय वर्षासाठी अटी व शर्तीत बदल अथवा आहे त्याच अटी शर्ती बंधनकारक राहतील.

८) इचलकरंजी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दैनंदिन दरानेच वसुली केली पाहिजे. जादा दराने वसुली केलेचे निदर्शनास आल्या नंतर त्या रक्कमेच्या 5 पट दंड म्हणून वसुल केला जाईल.

९) मंजूर ई निविदाधारकाने याकामी नियुक्त केलेल्या कर्मच्याऱ्यांची नांवे महानगरपालिकेस कळविणे बंधनकारक राहील. कर्मचारी यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच गणवेश व ओळखपत्र स्वखर्चाने देण्याची आहेत. सदर कर्मचाऱ्यांचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध असणार नाही. या कर्मचाऱ्यांना ई निविदाधारकांने किमान वेतन कायदयातील नियमानुसार वेतन दिले पाहिजे. वेतनासंबंधी तक्रार आलेस मंजूर ई निविदाधारकांने आपल्या स्तरावर निर्गत करणेचे आहे.

१०) दैनंदिन बाजार फी व स्टॉल भाडे वसुली संदर्भात कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्या संदर्भात मा. आयुक्तसो यांचा निर्णय अंतिम राहील. व तो निर्णय ई निविदाधारकांवर बंधनकारक राहील. तसेच एखांदा रस्ता अथवा जागा बाबतचा निर्णय म.न.पा.चा असेल.

११) वसुलीच्या वेळी विक्रेते, फेरीवाले यांना द्यावयाच्या पावत्या निश्चित दरा प्रमाणेच रक्कमेची पावती देणेचे आहे. मा. आयुक्तसो यांना आवश्यकता असल्यास वसुल होणा-या विक्रेत्यांचे यादी सादर करणे बंधनकारक राहील.

१२) कोणत्याही कारणास्तव (नैसर्गिक आपत्ती, शासकीय आदेश, संप,मोर्चे, आंदोलन, दंगली, साथरोग, इ.) दैनंदिन बाजार वसुली झाली नाही, तसेच कोणत्याही कारणास्तव वसुली संदर्भात वादविवाद होवून कोणतीही जिवीत वा वित्तहानी झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ई निविदाधारक यांचेवर राहील यांची महानगरपालिकेला तोशिष लागू देण्याची नाही.

१३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २३४ "उत्सवाच्या प्रसंगी म.न.पा मालकीचे सार्वजनिक रस्ते/ उपांगे वापर करीत असल्यास नियमा प्रमाणे पावती करावी".

१४) अटी/शर्तीचा भंग झालेचे सिध्द झालेस प्रथमत: रु.5 हजार, दुसऱ्यांदा रु. 10 हजार, तिसऱ्यांदा रु. 15 हजार व तद्नंतर बयाणा रक्कम व 3 महिन्याचे भरणा केलेली रक्कम जप्त करणेत येवून ठेका रद्द करणेत येईल. व म.न.पा. कडून वसुली करणेत येईल अथवा फेर निविदा/ ई-लिलाव करणेत येईल. अशा तऱ्हेने केलेल्या कार्यवाहीत जे नुकसान होईल ती रक्कम मक्तेदार यांचेकडून मनपा वसुल करील. ही रक्कम कोणत्याही प्रकारची सबब न सांगता अगर तक्रार न करता मक्तेदारास भरणा करावा लागेल. मात्र यात म.न.पा.चा फायदा झालेस त्यावर कोणत्याही प्रकारचा मक्तेदाराचा हक्क राहणार नाही. तसेच भरणा केलेल्या रक्कमेवर व्याज मिळणार नाही.

१५) निविदा मंजूर झालेनंतर 7 दिवसाच्या आत किंवा काम सुरु होण्यापुर्वी मक्तेदार यांनी योग्य त्या स्टँप पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. जामीनदाराची योग्यता स्विकारणे हे मा. आयुक्तांच्या अधिकारात असेल. करारनामा व जामिन कदब्याकरीता येणा-या खर्च हा मक्तेदाराने करावयाचा आहे.

१६) मक्तेदारास मक्ता रद्द करणे किंवा अन्य इसमास मक्ता हस्तांतरीत करणेचे हक्क राहणार नाही.

१७) इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या व्यंकोबा मैदान चौक परिसरात सार्वजनिक गणेशोत्सव कालावधीमध्ये रस्ते रहदारीस अडथळा न होता रस्त्यांच्या बाजूस विविध स्टॉल, मिनी एस.एल.वर्ल्ड व आनंद मेळावा करीता मैदान / सार्वजनिक जागा भुईभाडेने वसुली करणेचे अधिकार मक्तेदार यांचेकडे राहतील त्याबाबतच्या सर्व शासकीय कार्यालयांचे ना हरकत दाखले घेणे बंधनकारक राहील.तसेच शहापूर यात्रा उत्सवावेळी सार्वजनिक वाहतुकीस रस्त्यास अडथळा न होता उभारणेत आलेल्या स्टॉलची / मंडप वसुली म.न.पा.ने निश्चित केलेल्या दराने मक्तेदाराने करणेचे आहे तसेच तक्रारी प्राप्त झालेस उक्त जागा देता येणार नाही.

१८) गणेशोत्सव काळात ना.बा घोरपडे चौक व शहापूर यात्रा अशा सण व उत्सव प्रासंगिक वेळी काही नागरिकांचे उक्त जागे बाबत तक्रारी प्राप्त झाल्यास उक्त जागा अथवा इतर वेगळी जागा द्यावची झाल्यास मंजूर करणे अथवा नाकारण्याचा सर्व अधिकार कोणतेही कारण न देता म.न.पा चा राहील.

१९) ई- निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेत असताना महानगरपालिकेची कोणतीही येणेबाकी नसल्याबाबत ना-देय प्रमाणपत्र लिलाव बोली रक्कमे सोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२०) हातगाडी/फेरीवाले/व्यावसायिक संबंधी शासनाच्या प्रचलिक धोरणात शासनाने किंवा महानगरपालिकेने वेळोवेळी केलेले बदल/ दुरुस्त्या त्यांचे पालन करण्याची जबाबदारी निविदा धारकांची असेल. सुचनांचे अंमलबजावणी करणे निविदाधारकावर बंधनकारक असेल. म.न.पा. ने परवाना दिलेले हातगाडी/फेरीवाले/व्यावसायिक यांचेकडून मक्तेदारास कोणत्याही प्रकारची फी वसूल करता येणार नाही.

२१) इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन बाजार फी वसुली करताना निविदा धारकांस कोणतेही संरक्षण महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करुन दिले जाणार नाही. निविदा धारकांची निविदा व मालमत्तेची संपूर्ण जबाबदारी स्वत:ची राहील. तथापी फी वसुलीस कोणताही फेरीवाला, विक्रेता, स्टॉलधारक यानी नकार दिलेस त्याची कल्पना / तक्रार महानगरपालिकेकडे केलेस त्यांचेवर महानगरपालिका कारवाई करेल. दैनंदिन बाजार फी , स्टॉल भाडे व मंडप फी वसुली झाली नाही म्हणून मक्तेदारास कोणत्याही प्रकारची म.न.पा.कडून नुकसान भरपाई देणेत येणार नाही.

२२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदी व अटी ,शर्ती, शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा,कायदे,नियम,निर्देश इ. लागू तारखेपासून निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

२३) ई निविदाधारक मंजूरीबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्तसो यांनी राखून ठेवलेले आहेत. त्याबाबत ई निविदाधारकांना कोणत्याही स्वरुपाची तक्रार करता येणार नाही.

२४) GST व अन्य शासकीय कराची जबाबदारी ई निविदाधारकांची राहील. तसेच कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी (EPF) व ESIC चा भरणा वेळोवेळी करणेची जबाबदारी ई निविदाधारकांवर राहील.आवश्यक ती चलने महानगरपालिकेकडे जमा करावे. तसेच GST नोदणी अनिवार्य व सर्व कर / शुल्क ई-निविदा धारकाने स्वत: भरावे आहे.

२५) ई निविदा मंजूरी नंतर मंजूर निविदाधारकांने विहित रक्कमेच्या मुद्रांकावर, विहित नमून्यातील करारपत्र करुन देणे बंधनकारक राहील. याबाबतचा संपूर्ण खर्च निविदाधारकांने करणेचा आहे.

२६)मक्तेदार यांनी ऑफिस साठी पत्र व्यवहार करण्यासाठी ऑफिस पत्ता , घरफाळा पावती, भाडे करार (ऑफिस भाडेचे असल्यास), संमती पत्र आवश्यक आहे. तसेच ऑफिस पत्ता बदलेस इकडे कळविणे बंधनकारक राहील.

२७) मक्तेदार यांनी अधिकृत पावती पुस्तकांचा वापर किवा डिजिटल पावती प्रणाली वापरणे आवश्यक आहे.

२८) अचानक तपासणी (Surprise Inspection) करण्याचा अधिकार व रेकॉर्ड तपासण्याचा अधिकार महापालिकेस राहील.

२९) सदर निविदे संबंधी वाद, न्यायिक, क्षेत्र स्थानिक न्यायालय इचलकरंजी राहील.

३०) नैसर्गिक आपत्ती, विशेष परिस्थितीत सवलत देण्याचा अधिकार प्रशासनाकडे / मा. आयुक्त यांच्या कडे राहील.

३१) अपवादात्मक परिस्थितीमध्ये लेखी कारणे नमूद करुन मंजूर ई निविदा / ई लिलाव नामंजूर करणेचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

३२) वरीलपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झालेस इचलकरंजी महानगरपालिका नोटीस न देता आपला सदर ई निविदा रद्द केली जाईल करार करते वेळी जामीनदाराचे फोटो, आधारकार्ड, पॅनकार्ड, घरफाळा पावती आवश्यक आहे.

३३) ठेक्याची रक्कम महापालीकाकडे येणे बाकी असलेस रक्कम भरणेची जबाबदारी मक्तेदार तसेच जमीनदार यांची हि राहील.

३४) ई निविदा नोटीसमधील सर्व अटी शर्ती या कराराचा भाग राहील.

३५) कोरी ई निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१५/ ५ /२०२६ रोजी स.११ :०० वाजले पासून दि.२६/ ५ /२०२६ रोजी दु. २ :०० वाजेपर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील

३६)भरलेली ई निविदा सादर करण्याची अंतिम दि२६/५ /२०२६ दुपारी २:०० वाजेपर्यंत राहील.

३७) कोणतीही ई निविदा मंजूर अथवा सर्व ई निविदा नामंजूर करणेचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.

३८) अधिक माहितीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर व मार्केट विभागाकडे संपर्क साधावा.

३९)ई निविदा प्रक्रीयाबाबत तसेच वरील नमूद अटी शर्तीसंबंधात भविष्यात कोणतीही वाढ उद्‌भवल्यास त्याबाबत मा. आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (श्रीकांत पाटील) | (आरती पाटील – खोत) | (विकास खोळेपे) | (विद्या कदम) | (सुषमा शिंदे कोल्हे) |
| प्र.सहा आयुक्त | मुख्य लेखापरीक्षक | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | उपायुक्त (४) | अति. आयुक्त |

Signature Not Verified

Digitally signed by Shrikant Shivgonda Patil
Date: 2026.05.14 12:25:41 IST
Location: Maharashtra-MH